महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. :- १/११०
दिनांक :- २० /०५/२०१७

महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका,पुणे-५.
जा.क्र.:- मआ/उआ(साप्र)/आस्था/१०००
दिनांक :- २० /०५/२०१७

## -: आ ज्ञा प त्र :-

विषय : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी)वर्ग-३ या पदावरील हंगामी नेमणूकीबाबत.
संदर्भ : १. मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. १/८४४, दिनांक ०५/०१/२०१७.
२. मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. १/१०९, दिनांक २०/०५/२०१७.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील ''कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी)'' वर्ग-३ (वेतनश्रेणी रु.९३०० -३४८००+ ग्रेड पे ४४०० पदवीधारक/४३०० पदविकाधारक + मान्य भत्ते) या संवर्गातील खालील उमेदवारांची नेमणूक करणेसाठी तयार करणेत आलेल्या निवडयादीस संदर्भ क्र.१ चे ठरावान्वये मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर मान्यता प्राप्त निवडयादीवरील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) उमेदवारांची महानगरपालिका आस्थापनेवर संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तपशिलानुसार हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

**''कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)''वर्ग-३ (वेतनश्रेणी रु.९३०० -३४८००+ ग्रेड पे ४४०० पदवीधारक/ ४३०० पदविकाधारक + मान्य भत्ते )**

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GHADGE GEETANJALI DNYANESHWAR | Open | 1003239 | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 2 | NARNAVAR VARSHARANEE AGATRAO | NT(C) | 1000786 | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 3 | CHALUKYA MOHINI TANAJIRAO | Open | 1003407 | नगर रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 4 | AGRE SWATI SHRIRANG | Open | 1004778 | विकास योजना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 5 | SIDDUL SWATI RAMDAS | SBC | 1000115 | विकास योजना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 6 | DEOKAR BHAGYASHRI UTTAMRAO | Open | 1005080 | वारसा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 7 | NASHTE AARTI SHIVPRASAD | Open | 1006416 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 8 | BAWANKAR RUCHITA SANJIV | OBC | 1006899 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 9 | WAGH SHITAL MADHUKARRAO | Open | 1008002 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 10 | BHOSALE ABHILASHA ABASAHEB | Open | 1002474 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 11 | KOLATE NEHA RAJENDRA | Open | 1008854 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 12 | PATIL KAVITA ANANDRAO | Open | 1005709 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 13 | RANBHOR SOUDAMINI PRATAP | Open | 1000340 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 14 | BIDKAR POONAM CHANDRAKANT | OBC | 1001163 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 15 | BANE RAJASHREE VILAS | OBC | 1000199 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 16 | MURADE RAJESHWARI ASHOK | OBC | 1007147 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 17 | BAWANKULE DIPALI ASHOK | Open | 1006653 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 18 | PAWAR PUNAM NETAJI | Open | 1003584 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 19 | BANTE PRIYANKA DEVIDAS | OBC | 1000760 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 20 | PATIL PRIYANKA MUKESH | OBC | 1005038 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 21 | NANDE GAURI SUDHIR | Open | 1004105 | पथ विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 22 | MOHITE VRUSHALI VIKRAM | Open | 1005301 | बांधकाम विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 23 | REDDY ANJUSHA RAM | OBC | 1007668 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 24 | TIKALE SHARAYU LAXMANRAO | OBC | 1007134 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 25 | KHADE AMRUTA MHATARDEV | NT(D) | 1004237 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 26 | CHAURE ARUNA SHESHRAV | SC | 1002037 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 27 | ABHALE ANITA ASHOK | Open | 1002491 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 28 | BHAVAR SEEMA TULSHIRAM | Open | 1000262 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 29 | BHAMBARE YOGITA PANDIT | Open | 1000465 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 30 | YETTE PRIYA ARUN | OBC | 1004510 | पाणी पुरवठा विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 31 | NIKATE SHWETAMBARI SANJAY | OBC | 1000151 | मलनि:सारण, देखभाल व दुरुस्ती विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 32 | BIRAJDAR SWATI SHESHRAO | Open | 1004408 | मलनि:सारण, देखभाल व दुरुस्ती विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 33 | BHUKTAR VAISHALI SAMBHAJI | SC | 1004629 | मलनि:सारण, देखभाल व दुरुस्ती विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 34 | WALKE RUPALI TUKARAM | SC | 1002024 | मलनि:सारण, देखभाल व दुरुस्ती विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 35 | JOSHI SHITAL SHAMRAO | Open | 1001279 | प्रकल्प कार्यालय क्र.१ | नवनिर्मित रिक्त जागी |
| 36 | SAWANT SNEHAL ANANDRAO | Open | 1004372 | वाहतुक नियोजन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 37 | SHINDE MAYURI ANIL | Open | 1005167 | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 38 | LATIKA CHANDRAKANT MHASKE | NT(B) | 1006148 | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 39 | TAYADE VRUSHALI DIPAK | SC | 1004433 | येरवडा क्षेत्रिय कार्यालय | नवनिर्मित रिक्त जागी |
| 40 | KHANDARE BHAGYASHRI SUBHASHRAO | SC | 1007517 | नगररोड क्षेत्रिय कार्यालय | नवनिर्मित रिक्त जागी |
| 41 | YEDAGE NAKUSA LAXMAN | NT(C) | 1001883 | टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय | नवनिर्मित रिक्त जागी |
| 42 | KODAPE PRADNYA MAHADEVRAO | ST | 1007593 | बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय | नवनिर्मित रिक्त जागी |
| 43 | RATHOD MADHURI GOPAL | DT(A) / VJ(A) | 1007817 | हडपसर क्षेत्रिय कार्यालय | नवनिर्मित रिक्त जागी |
| 44 | PATIL VISHAL RAGHUNATH | OPEN | 1000479 | बांधकाम विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 45 | SAINI UMESHKUMAR PANNALAL | OPEN | 1004617 | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 46 | DANDIME GANGAPRASAD CHANDRAPAL | OPEN | 1008454 | बांधकाम विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 47 | SHAIKH ARIF SHAFI | OBC | 1004404 | भवन रचना विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |

**"कनिष्ठ अभियंता (विद्युत)" वर्ग-३ (वेतनश्रेणी रु.९३०० -३४८००+ पदवीधारक ४४००/पदविकाधारक ४३०० ग्रेड पे+मान्य भत्ते )**

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MORE MONALI JALINDER | Open | 1009383 | विद्युत विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| 2 | MARTALEKAR MANGAL SHANKARRAO | Open | 1011553 | आरोग्य विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |
| 3 | CHAUDHARI PRIYANKA RAJENDRA | OBC | 1010404 | घनकचरा व्यवस्थापन विभाग | शेड्युलमान्य रिक्त जागी |

**"कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी)" वर्ग-३ (वेतनश्रेणी रु.९३०० -३४८००+ पदवीधारक ४४००/पदविकाधारक ४३०० ग्रेड पे+मान्य भत्ते )**

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | GHADGE SUNITA DYANDEV | Open | 1012436 | मोटार वाहन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 2 | WALUJAKAR MONICA HARISHACHNDRA | Open | 1016308 | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |
| 3 | TELANG BHAGYASHREE HIRAMAN | SC | 1018515 | मोटार वाहन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा गट | परिक्षार्थी क्र. | नेमणूकीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 4 | INAMDAR AFROZ SHAUKAT | OBC | 1013232 | घनकचरा व्यवस्थापन विभाग | नवनिर्मित रिक्त जागी |

१. वरील उमेदवाराची नेमणूक मनपा सेवाविनियमातील क्र. १०(अ) नुसार दोन वर्षासाठी परिविक्षाधीन पध्दतीने करण्यात येत आहे. वरील उमेदवाराची प्रत्यक्ष कामावर रुजू झाल्याचे दिनांकापासून दोन वर्षातील कार्यालयीन उपस्थिती, वर्तणूक व कामातील प्रगती समाधानकारक असल्याची संबंधीत खातेप्रमुख यांनी खात्री करावी. तसेच उमेदवारांचे दोन वर्षातील काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास व संबंधीत खातेप्रमुखांनी तसा लेखी अहवाल सादर केल्यास उमेदवारास कोणतेही कारण अगर पूर्वसुचना न देता पुणे मनपा सेवेतून कमी करण्यात येईल.

२. वरील उमेदवाराने नेमणूक केलेल्या खात्याच्या प्रमुखांकडून पत्र घेऊन पुणे महानगरपालिका वैद्यकीय बोर्डाकडून शारिरीक तपासणी करुन घ्यावी.

३. वरीलप्रमाणे मनपामध्ये नेमणूक होत असलेले जे उमेदवार अन्य ठिकाणी (सरकारी/ निमसरकारी/ अगर खाजगी) नोकरी करित असतील, त्यांनी तेथील नोकरीतून कोणत्याही स्वरुपाचा दोष न ठेवता त्यांना मुक्त करण्यात आले असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला दाखला महानगरपालिका सेवेत रुजू होताना नेमणूक खात्याकडे सादर करणे आवश्यक आहे. असा दाखला असल्याखेरिज त्यांना पुणे महानगरपालिकेच्या सेवेत रुजू करुन घेता येणार नाही.

४. अन्य ठिकाणी यापूर्वी नोकरी करित नसल्यास व त्यामुळे असा दाखला सादर करता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे.

५. अनुभवाचा दाखला व इतर दाखल कागदपत्रांच्या वैधता व सत्यतेबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित उमेदवारास रुजू करून घेणेपूर्वी प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. त्याबाबतचा नमुना या आज्ञापत्रासोबत जोडला आहे. सदर प्रतिज्ञापत्र तहसिलदार / नोटरी यांचे समोर केलेले असावे. तसेच वरील उमेदवार यांनी नेमणूकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक, अनुभव इ. बाबत सादर केलेली माहिती केंव्हाही असत्य असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करणेत येईल. तसेच त्यांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/ यांत्रिकी) या पदावर हक्क सांगता येणार नाही.

६. वरील उमेदवारास रुजू करुन घेणेपूर्वी त्यांचे शैक्षणिक पात्रतेचे मूळ दाखले, जन्मदिनांकाबाबतचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र इ. बाबी मा.खातेप्रमुख यांनी तपासून ते बरोबर असल्याबाबतची खात्री करुन घ्यावी. त्याच्या सांक्षाकिंत प्रती आस्थापना विभागाकडे सादर कराव्यात.

७. उमेदवाराकडे जन्म दिनांकाबाबतचा दाखला उपलब्ध नसेल तर त्याबाबतीत शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परिक्षा प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु

अशा उमेदवाराची भविष्यात जन्मदिनांक बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. संबंधित उमेदवार हे आज्ञापत्र निर्गमित केल्यापासून १ महिन्याचे आत कामावर हजर न झाल्यास त्यांची नेमणूक रद्द समजण्यात येईल. तसेच त्यांचे निवडयादीवरील नाव कमी करणेत येईल व त्याबाबत त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९. जे उमेदवार १ महिन्यात रूजू होणार नाहीत, अशा उमेदवारांचा अहवाल संबंधित खातेप्रमुख यांनी आस्थापना विभागाकडे सादर करावा अथवा त्यांनी रुजू होणेसाठी मुदतवाढ मागितली असल्यास त्याबाबत आस्थापना विभागाकडे अवगत करावे.

१०. उपरोक्त उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी संबंधित उमेदवारांकडून आवश्यक इतकी रक्कम सेवा अनामत म्हणून घेणेबाबतची तजविज संबंधित मा.खातेप्रमुख यांनी करावी.

११. मनपा सेवाविनियम व सेवावर्तणूक नियमांचे पालन करणेबाबतच्या सूचना संबंधित मा.खातेप्रमुख यांनी सदर उमेदवारांना देणेची तजवीज करावी.

१२. वरील उमेदवारांची नेमणूक पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून, त्यांना मनपा सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. पूर्वसूचना न देता राजीनामा दिल्यास एक महिन्याच्या मुदतीपेक्षा राजीनाम्याची मुदत जितक्या दिवसांनी कमी असेल तितक्या दिवसांच्या पगाराची रक्कम (सर्व भत्त्यांसहित) त्यांचेकडून वसुल करणेत येईल, अशी समज खात्याने त्यांना द्यावी व समज मिळाल्याबद्दल आज्ञापत्रावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

१३. उपरोक्त उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना अनुज्ञेय राहणार नाही. उपरोक्त सर्व उमेदवारांना महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/ १२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये लागू करण्यात आलेली अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१४. वरील उमेदवारांना दरमहाचे वेतन नेमणूक खात्याने अदा करावयाचे आहे.

१५. महाराष्ट्र शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये वरील उमेदवारांनी हजर झालेल्या दिनांकापासून दोन वर्षांचे आत शासनाची संगणक विषयक एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदर परिक्षा मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्यांची नेमणूक संपुष्टात आणणेत येईल.

१६. उपरोक्त उमेदवारांना कार्यालय परिपत्रक जावक क्र.मुले/वेआ/३७५१,दिनांक २९/१२/२००९ अन्वये प्रारंभिक वेतन द्यावे.

१७. महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र. मआ/उआ(ज)/६९०, दि.८/१०/२०१४ चे कार्यालयीन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेतील प्रत्येक मनपा अधिकारी/ कर्मचाऱ्याने (वर्ग-४ मधील कर्मचारी वगळता) मनपा सेवेतील कोणत्याही पदावरील नियुक्तीव्दारे त्याच्या प्रथम सेवाप्रवेशाच्या वेळी, अशा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्याची स्वत:ची मत्ता व दायित्वे याबाबतची विवरणे प्रपत्र १, २ व ३ यातील प्रपत्रामध्ये (म्हणजे (अ) अचल मालमत्तेचे विवरण व चल मालमत्तेचे विवरण आणि (क) कर्जे व दायित्वे याबाबतचे विवरण) ते सध्या कार्यरत असलेल्या खात्यांच्या खातेप्रमुखांकडे सादर करावित.

१८. शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३०१४/प्र.क्र.२/नवि-२२, दि. २६/८/२०१४ अन्वये पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम २०१४ ला प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार सर्व संबंधित सेवकांनी परिशिष्ट ३ मध्ये नमूद केलेली अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांचेकडील परिक्षा चार वर्षात तीन संधीमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य असून सदर परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास शासन निर्णयानुसार संबंधित खातेप्रमुख यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

१९. निवडयादीवरील उर्वरित खेळाडू उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्र विभागीय संचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेनंतर व उर्वरित महिला उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याचे नियुक्तीचे आदेश पारित केले जातील.

२०. निवड यादीवरील उमेदवारांची सेवाज्येष्ठता मूळ निवडयादीतील ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या गुणानुक्रमांकानुसारच राहिल.

२१. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का-२ मंत्रालय मुंबई, दि.२५.५.२००१ नुसार मा. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकडे खुल्या प्रवर्गातुन निवड झालेल्या महिला उमेदवारांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रे तपासणीसाठीचा अहवाल सादर करणेत आला आहे. सदरच्या अहवालास अधीन राहुन संबंधित उमेदवारास तात्पुरती नेमणुक देण्यात येत आहे. सबब सदर महिला उमेदवारांची सादर केलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र महिला व बाल विकास विभागाकडून अवैध ठरल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची नेमणुक संपुष्टात आणण्यात येईल. याबाबत त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करणेत येईल. तसेच त्यांना कनिष्ठ अभियंता(स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) या पदावर हक्क सांगता येणार नाही.

२२. ज्या उमेदवारांनी खाजगी कंपनी/संस्था मधील अनुभवाबाबत प्रमाणपत्र सादर केली आहेत.अशा उमेदवारांची नियुक्ती ही प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सादर केलेल्या अनुभवाबाबत प्रतिकुल (चुकीची अथवा खोटी) माहिती आढळल्यास कोणत्याही प्रकारची सुचना न देता नियमानुसार सेवा संपुष्टात आणण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहील.

२३. **संबंधित उमेदवार खात्यात रूजू झाल्यानंतर सदर उमेदवाराचा रूजू अहवालाची छायाप्रत, प्रतिज्ञापत्राची मुळप्रत, जातीचा दाखला, अज उमेदवाराचे बाबतीत जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्राच्या छायाप्रती उमेदवारनिहाय आस्थापना विभागाकडे सादर करावयाचा आहे.**

२४. या आज्ञापत्रातील उपरोक्त अटी/शर्ती व वेळोवेळी मे.राज्य शासन निर्गमित करील ते आदेश संबंधित उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

२५. वरील उमेदवार कामावर रुजू होताच त्याप्रमाणे जरुर ते निवेदन संबंधित मा.खातेप्रमुख यांनी आस्थापना विभागाकडे सादर करावे.

वरील सर्व अटी/शर्तीची काटेकोरपणे पूर्तता संबंधित उमेदवाराकडून करुन घेणेची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख यांची राहिल.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी जरुर ती तजविज करावी.

(कुणाल कुमार)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका

प्रत – संबंधित उमेदवार /संबंधित मा.खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.

यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . .

(प्रकाश बोरसे) 20/5/2017
**उप आयुक्त(सामान्य प्रशासन)**
पुणे महानगरपालिका

340

<u>नमुना</u>

**रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर खालील प्रतिज्ञापत्र मसुदा नोटरी/तहसिलदार यांचे साक्षांकन घेण्यात यावे.**

**-: प्रतिज्ञापत्र :-**

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------, श्री. -------------------- ---------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय _____ वर्षे, राहणार -------------------------- -------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१. मी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) या पदासाठी दि.०८/०८/२०१६ चे जाहिरातीनुसार माझा ऑनलाईन अर्ज दाखल केला आहे.

२. मला दिनांक_____________ रोजी मनपा प्रशासनाकडून प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात आले होते. सदर दिवशी मी सादर केलेली शैक्षणिक/अनुभव/जात/सामाजिक/समांतर आरक्षण/डोमिसाईल/नॉन क्रिमिलीयर इत्यादी बाबतच्याप कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित/स्वयं साक्षांकित करून सादर केल्या आहे.

३. मी सत्य कथन करतो/करते की, सादर केलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे ही पूर्णपणे खरी (True) असून त्यामध्ये कोणताही फेरफार/बदल केलेला नाही.

४. मी 'कनिष्ठ अभियंता' या पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणीक पात्रतेशिवाय मिळविलेल्या अतिरिक्त शैक्षणीक पात्रतेविषयी किंवा इतर कोणतीही माहिती महापालिका प्रशासनापासून लपविलेली नाही.

५. उपरोक्त नमूद केल्यानुसार सादर केलेले प्रमाणपत्रे/कागदपत्रे खोटी अथवा चुकीची, बनावट (Forged) असल्याचे भविष्यात निष्पन्न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझेवर राहिल व मी फौजदारी गुन्हयास पात्र राहिन व नोकरीतून कमी करणेस व भविष्यात पुणे महानगरपालिकेत तसेच अन्यत्र कोठेही नोकरीस पात्र ठरणार नाही याची मला जाणीव आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) पदावरील नेमणूकीकरिता हे प्रतिज्ञापत्र शपथपुर्व लिहून देत आहे. सदर प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझे माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर असुन त्यावर आज दिनांक_____________ रोजी पुणे मुक्कामी मी स्वाक्षरी केली आहे.

**स्वाक्षरी**

(नाव ----------------------------)

प्रतिज्ञापत्र करणाऱ्यास ओळखतो

स्वाक्षरी

नाव ----------------------------------

वय ______ वर्षे, व्यवसाय --------------

राहणार ----------------------------------------------------